Dr. L.D. Balkhande Arts & Commerce College * Pauni * Dist. Bhandara

महाविद्यालय विकास समितीच्या २०२०-२०२१ सत्रातील प्रथम सभेचे इतिवृत्त (दि. १३/०३/२०२१)

सूचना क्र. सी डी सी/६ दि. ०६/०३/२०२१ नुसार आज दि. १३/०३/२०२१ ला दु. १२.०० वाजता सी डी सी समितीची २०२०-२०२१ सत्रातील प्रथम सभा सभाअध्यक्षा मा. डॉ. दिपा एम. बालखंडे मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली तसेच संस्था सचिव आद. श्री. मिलींद बालखंडे सर ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राचार्य कक्षात घेण्यात आली.

सभेला उपस्थित पदाधिकारी (नावे व सह्या)

१) श्री. एम. एल. बालखंडे
२) प्राचार्य डॉ. ए. एन. घोसमवार
३) उप प्राचार्य श्री. एन. पी. सिंगाडे
४) श्री. एस. एम. नंदागवळी
५) श्री. एम. जी. वाहाणे
६) कु. एस. एस. शंभरकर
७) श्री. एन. जी. जाधव
८) श्री. आर. जी. राऊत
९) श्री. ॲड. डी. एन. गोवर्धन
१०) श्री. डॉ. एम. एम. बांन्सू

13.03.2021

सभाध्यक्षा
महाविद्यालय विकास समिती

पेज नं. ३५ पुढे

Dr. L.D. Balkhande Arts & Commerce College
Dist. Bhandara
Pauni



Page :
Date : / /

- पेज क्र. ३४ वरुन पुढे -

विषय क्र.१ :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजुरी देणे :-

ठराव क्र. १ - 'महाविद्यालय विकास समितीचे' सचिव प्रभारी प्राचार्य कोसमकर सर ह्यांनी मागील दि. ११/०७/२०१८ च्या सभेतील ठराव क्र. २ नुसार विद्यार्थी संख्ये अनुरूप फर्निचर खरेदी ठराव क्र. ३ नुसार कॉम्पुटर सेट आणी सीपीयू ग्रंथाली झेरॉक्स मशीन खरेदी ठराव क्र ५ नुसार वॉटर कुलर खरेदी ठराव क्र. ६ नुसार संशोधन कक्षाची भविष्यात पुर्तता केली जाईल, अनावश्यक कामात प्राचार्यांचा हस्तक्षेप नको, राऊत ला मदतनीस म्हणून गुरुदास मेश्राम ऑफीसकामात सहभागी, संशोधन कक्ष, रिसर्च सेल, मा. अध्यक्षांच्या सूचने - नुसार सेल तयार करणे, प्रा. नंदागवळी यांच्या मते विद्यार्थी करीता पुरक वातावरण, सेल प्रगतीच्या हिशोबाने काम चालू आहे, असे सांगीतले. आणी ठराव क्र. १ सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

विषय क्र. २ :- महाविद्यालया करीता आवश्यक वस्तुंची खरेदी करणे :-

ठराव क्र. २ सभेपुढे विषय आल्यावर मा. प्राचार्यांच्या मते नविन कुलर, सिलींग फॅन दुरुस्ती या पूर्वी नविन सिलींग फॅन खरेदी करण्यात आले होते. आवश्यकतेनुसार बल्ब व ट्युबलाईट खरेदी करणे, दोन गोद्रेज आलमारी खरेदी करणे मा. मिलींद साहेबांच्या मते घरगुती आलमारी १ खरेदी करणे, तसेच जुण्या आलमाऱ्या दुरुस्ती करणे (नाफा खर्च), NAAC करीता फंड वाढी करीता १ लाख रुपये मिळतील असा खात्यामधून ख़र्ची करणे, कुलरची पुर्तता निधीवर अवलंबून राहील. सर्वानुमते ठराव क्र. २ ला मंजूरी देण्यात आली -

पुढे → पेज क्र. ३६

Dr. L. D. Balkhande Arts & Commerce College Paunl Dist. Bhandara



Page :
Date : / /

- पेज क्र. ३५ वरून पुढे -

विषय क्र. ३ :- जेव्हा द्वारा मूल्यांकन गुणांची वाढ व्हावी म्हणून नवीन कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम राबविणे :-

ठराव क्र. ३ नूसार संगीत आणि इतिहास अंतर्गत कोर्स चालू करता येवू शकते सभा अध्यक्षांनी मत व्यक्त केले. प्रा. वाहाणे सरांच्या मते दोन ते तीन सॉर्टटर्म कोर्स चालू करणे आवश्यक आहे. त्या अन्वये प्राचार्यांनी असे मत व्यक्त केली की NAAC च्या मूल्यांकनाच्या गुणांकरिता सॉर्ट टर्म कोर्स अत्यावश्यक आहे. प्रा. वाहाणे सरांच्या मते इतिहासीक स्थळ, गोसे डॅम सॉर्ट टर्म कोर्सला अनूकुल राहू शकतात. डॉ. गोवर्धन यांच्या म्हणण्यानूसार काही कोर्स असे असले पाहिजे की जेणे करून १२ वीच्या नंतर विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल. प्रा. गजामेघे सरांच्या मते संगीत संगीतमध्ये सॉर्ट टर्म कोर्स होऊ शकतो. डॉ. गोवर्धन यांच्या मते मुंबई म्यूझीअम मध्ये संगीत विषयाचे कोर्स संग्रहीत असल्याचे सांगितले. सॉर्ट टर्म कोर्स ३० दिवसाचेच असे सर्वानूमते ठराव क्र. ३ ला मंजूरी देण्यात आली.

विषय क्र. ४ :- विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात संगणकाची व्यवस्था करणे :-

ठराव क्र. ४ नूसार प्रा. नंदागवळी सरांच्या मते NAAC च्या रेसो करिता १० कॉम्पूटर पी सी आवश्यक आहे. ३० विद्यार्थ्यांच्या मागे १ पी सी या प्रमाणे, शेंभरकर मॅडमनी असे मत दर्शविले की कॉम्पूटर मेन्टेनन्स टेन्डर जुन मध्ये संपलेला आहे. आणि कॉम्पूटर लॅब करिता वेगळ्या रूमची गरज आहे. डॉ. गोवर्धन यांच्या मते नवीन कॉम्पूटर

पुढे → पेज क्र. ३७

Dr. L.D. Balkhande Arts & Commerce College
Dist. Bhandara
* Pauni *



Page :
Date : / /

- पेज क्र. ३६ वरून पुढे -

पी सी ॲडवान्स रिमूट असतात ते खरेदी करणे योग्य. मा. मिलींद साहेबांच्या मते कॉम्पुटर दुरुस्त करणे, नविन पी सी राशी उपलब्ध झाल्यावर घेता येईल सर्वानुमते ठराव क्र ४ ला मंजूरी देण्यात आली.

विषय क्र. ५ :- दुर्मिळ पुस्तके इ. जरनल्स, संदर्भ ग्रंथ खरेदी करणे :-
ठराव क्र. ५ नुसार डॉ. गोवर्धन यांच्यामते दुर्मिळ पुस्तके दुर्मिळ असतात नेटवरुन सॉफ्ट कॉपी उपलब्ध होवू शकतात. शेंमरकर मॅडम यांनी असेमत दर्शविले की प्रत्येकांनी ४-४ रेफरन्स बुक बोलावणे, ग्रंथालयासाठी दरवर्षी ५०,०००/- हजाराचे बुक खरेदी करणे आणि त्यांचे वेतन त्याच वर्षी अदा करणे गरजेचे आहे, मा प्राचार्यांनी संदर्भ ग्रंथासाठी ४०,०००/- पूर्तता केली असे सभेपुढे सांगितले. मा. सभा अध्यक्षांच्या मते प्रत्येकांनी २-२ विषयांचीच नावे देवून ग्रंथालयासाठी आवश्यक बाबी खरेदी करणे, प्रा. नंदागवळी सर यांनी दुर्मिळ पुस्तक नेटवरुन सर्च करणे, शेंमरकर मॅडम यांनी पवनी नगरी पुस्तक मिळवण्यासाठी प्रयत्न करणे आणि १९८० नंतरच्या संदर्भ खरेदी करणे. ठराव क्र ५ सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

विषय क्र. ६ :- प्रा. जांगळे सर यांच्या अतिरिक्त झालेल्या वैद्यकीय रजा बिना पगारी रजा म्हणून मंजूर करून त्यांच्या पगारा-तून कपात करणे :-
ठराव क्र. ६ :- नुसार मा प्राचार्यांनी असेमत मांडले की ऑफीस रेकॉर्डनूसार (हजेरी रजिस्टर) प्रा. जांगळे यांचे एकूण ६१ रजा होतात त्याही २ वर्ष ५ महिन्यामध्ये तसी

→ पेज क्र. ३८ पुढे

- पेज क्र. ३७ वरून पुढे -

त्यांची महाविद्यालयामध्ये नियुक्ती २०१६ची आहे. परंतु संपूर्ण कालावधीचा विचार करता त्यांना ४५ रजा मान्य आहेत. दरवर्षी वैद्यकीय सुटी १०-१० च्या अनुषंगाने ६१ मधून ४५ वजा जाता १६ रजा अतिरिक्त ठरतात. मा. मिलींद साहेबांच्यामते जेवढ्या रजा अतिरिक्त होतात. त्याची सर्व्हिसबुक वर नोंद घेवून १६ दिवसांचा पगार वजा करणे अशी अपेक्षा दर्शविली. प्रा. नंदागवळीसरांच्या मते ज्या-ज्या महिन्यामध्ये वैद्यकीय रजा आहेत त्या महिन्यात कपात व्हावी, या अतिरिक्त संदर्भाने जे डी कार्यालया-कडून निर्देश मागवून योग्य ती कार्यवाही करावी. यापूर्वी गजभिये सरांच्या सुट्या प्राचार्यांनी ॲडजेस्ट केल्यात तशाच प्रकारे यांच्या सुट्या ॲडजेस्ट करून द्यावे असे सांगितले. जे करून भविष्यात समस्या येवू नये. मा. प्राचार्यांनी प्रा. जांगळे सर यांना या बाबतीमध्ये सर्व सूचना वेळोवेळी दिल्यात. जे डी ला पत्राद्वारे विचारणा करण्यात येईल असे मत व्यक्त केलेत आणि ठराव क्र. ६ सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

विषय क्र. ७ :- मा. अध्यक्ष यांच्या वतीने वेळेवर येणारे विषय :-

ठराव क्र. ७ :- (१) डॉ. जे. आर. संतोषी यांच्या कालखंडामध्ये शिक्षण शुल्क फार थोड्या प्रमाणात वेतन खात्यामध्ये भरण्यात आलेत. तत्कालीन प्रभारी प्राचार्य यांनी शिक्षण शुल्क वसुली च्या अनुषंगाने कार्यवाही केली नाही. सध्या स्थितीमध्ये स्कॉलरशीप खात्यामध्ये १३,६५,१३७/- रुपये जमा आहेत.

✓ (२) इन्कम टॅक्स ऑफिस तर्फे महाविद्यालयावर पेनॉल्टी

→ पेज क्र. ३९ पुढे

Page :
Date : / /

-पेज क्र. ३८ वरून पुढे-

✓ त्यातून झाले आवारणयात आली, त्या अनुषंगाने मा
मिलींद साहेबांनी असे सूचविले की, I T अंतर्गत FIR
दर्ज करणे त्या साठी त्री सदस्य कामीटी नियुक्त करणे
या कामिटीमध्ये १) ऑडीटर २) मॅनेजमेन्टचा मुख्य
सदस्य ३) स्टोप मधून प्रा. वाहाणे यात्रमाणे.

✓ मा. प्राचार्य (डॉ. कोसमकर) मते पूर्वीचे प्राचार्य
डॉ संतोषी आणि क्लर्क यांनी शिक्षण शुल्काच्या हिशोबाने
कोणतेही कागद पत्रे दाखविले नाहीत. असेसमेन्टच्या
वेळेस सांजेकर मॅडम (जे. डी. कार्यालयातील अग्रणी
प्रशासकीय अधिकारी) यांनी सांगितले होते की, नियमीत
प्राचार्यांच्या कालखंडात नॉन शालरी ग्रॅंट म्हणून वेतनाच्या
५ % रक्कम महाविद्यालयाला खर्च करता येवू शकते.
शिक्षण शुल्क म्हणून विद्यार्थी संख्या × ८०० रुपये जे
रक्कम येयील ती रक्कम त्या वर्षात वेतन खात्यात जमा
करणे आवश्यक आहे. यावर मा मिलींद साहेबांनी
५ वर्षाच्या रेकॉर्ड तपासनीकरीता पाच सदस्यीय
कामिटी गठित करावी या कामिटीमध्ये १) ओडीटर
२) स्टॉपमधून प्रा वाहाणे सर ३) मॅनेजमेन्ट मधून अध्यक्ष
अथवा सचिव ४) दुसऱ्या कॉलेजची व्यक्ती (क्लर्क) 5)
✓ नॉन टिचींग मधून राऊत या प्रमाणे.

४) लॉगवारी पुर्वांच्या ठिकाणी बदलावीणे :- दूसार
प्राचार्यांच्या मते लेखन वाचन कक्ष, संशोधन कक्ष, कॉम्पूटर लॅब
मुलांच्या तक्रारीखातर गठीत करणे आवश्यक आहे.
महाविद्यालयामध्ये दोन टायमिंग मध्ये विद्यार्थ्यांचे

→ पेज क्र. ४० पुढे

- पेज क्र. ३९ वरुन पुढे -

क्लासेस सुरू आहेत. कला शाखा सकाळच्या वेळेस आणी वाणीज्य शाखा दुपारच्या वेळेस. मा. अध्यक्षांच्या मते सकाळच्या वेळेस व्हाईस प्राचार्य देखरेख ठेवतील, दुपारच्या वेळेस प्राचार्य देखरेख ठेवतील, तसेच मराठी, इंग्लीश त्यासीच्या शेवटी ठेवणे, मराठी करीता १ CHB नियुक्त करणे, समाजशास्त्र करीता १ CHB नियुक्त करणे असे सूचविले.

५) NAAC फंड वाढविणे :-

मा. सभा अध्यक्षांच्या मते NAAC अकाऊन्टमध्ये फंड वाढी करीता आयोजनात बजटच्या मुद्दा सर्वप्रथम घेणे आवश्यक आहे. प्रा. नंदामवळी सरांच्या मते IQAC अंतर्गत विविध कार्यक्रीता उदा. NAAC ची फीस, नॅक टिमचा खर्च, IQAC च्या अंतर्गत ॲक्टीविटी लागणारा विविध खर्च या अनुषंगाने सभा अध्यक्षांनी सूचविले की, महाविद्यालयाचे मिसलेनीअस फंडच्या खात्यामधून १,००,०००/- रक्कम वळती करुन NAAC चे खाते २४२ मध्ये जमा करण्यात यावे. यामाध्यमातून NAAC करिता खर्च करावा, असे सर्वानूमते ठरावाला मंजूरी देण्यात आली.

सभेअंती सर्व विषयावर गहण चर्चा करुन झाल्यावर सभा अध्यक्षांच्या परवानगीने महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सभेला उपस्थीत सर्व सदस्यांचे उपस्थीती बद्दल सर्वांचे आभार मानून सभा समाप्त झाली असे जाहीर केली.

→ पेज क्र ४१ पुढे →

Page :
Date : / /

- पेज क्र. ४० वरुन पुढे -

सचिव तथा प्राचार्य
महाविद्यालय विन्यास समिती
(Dr. Deepa M. Balkhande) डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ
आर्टस अँण्ड कॉमर्स, पवनी